www.pclindia.in
info@pclindia.in
+91 217 2357645
+91 9168646531/32/33
CIN L24231PN1992PLC067126

**PCL/SEC/23-24/080** **14th February 2024**

| To, | To, |
|---|---|
| **National Stock Exchange of India Limited,**<br>"Exchange Plaza" 5th Floor, Plot No. C-1,<br>G Block, Bandra Kurla Complex,<br>Bandra (East), Mumbai – 400051<br><br>**NSE Scrip Code - PRECAM** | **BSE Limited,**<br>Phiroze Jeejeebhoy Towers,<br>Dalal Street,<br>Mumbai - 400001<br><br>**BSE Scrip Code – 539636** |

**Subject: Newspaper Advertorial – Emoss Mobile Systems B.V. Netherlands (WOS of Precision Camshafts Limited)**

Dear Sir/Madam,

Pursuant to Regulation 30 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, we wish to inform you that Precision Camshafts Limited (the Company) is going to publish a press release/ newspaper advertorial titled as "इमॉस - भारतातील इलेक्ट्रिक वाहन क्षेत्रात पदार्पण" (Emoss – Entering into Electric Vehicle Business in India) in Lokmat Newspaper (a Marathi Newspaper - Solapur edition) on Thursday, 15th February 2024 regarding updates in the Electric Vehicle Business and the progress achieved by EMOSS in that segment.

You are requested to take the same on record.

Thanking you,

For **Precision Camshafts Limited**

Tanmay Pethkar Digitally signed by Tanmay Pethkar Date: 2024.02.14 18:44:56 +05'30'

**Tanmay M. Pethkar**
Company Secretary and Compliance Officer
Membership No. A53618

# इमॉस : भारतातील इलेक्ट्रिक वाहन क्षेत्रात पदार्पण!

प्रिसिजन कॅमशाफ्टस् लिमिटेड आणि इमॉस इंडियाने इलेक्ट्रिक मोबिलिटी व्यवसायाच्या क्षेत्रात २०२३ या एकाच वर्षात लक्षणीय कामगिरी केली. इलेक्ट्रिक मोबिलिटीमधील संशोधन, उत्पादन सुविधा निर्माण करणे, ग्राहक आधार वाढवणे, वितरण व्यवस्था निर्माण करणे अशा सर्वच विभागात भविष्यवेधी कामगिरी पार पडली आहे. इमॉस इंडियाने इलेक्ट्रिक वाहन क्षेत्रातील एक सर्वोत्तम टीम उभी केली असून मागच्या वर्षभरातील कामगिरीची माहिती देताना आम्हाला अभिमान वाटतो,"ई–एलसीव्ही च्या उत्पादनासाठी सोलापुरात अत्याधुनिक उत्पादन कारखाना सुरू करून २०२३ या वर्षाची सुखद सुरुवात आम्ही केली.

या प्लान्टमुळे ई–मोबिलिटी क्षेत्रातील नाविन्य, संशोधन आणि उत्कृष्टता साध्य करण्याच्या दिशेने आम्ही मोठी झेप घेतली आहे. हलक्या व्यापारी वाहनांचे (ई–एलसीव्ही) विद्युतीकरण करणे याच उद्देशाने या प्लान्टची उभारणी करण्यात आली. एका शिफ्टमध्ये, एका स्टेशनवर संपूर्ण एलसीव्ही गाडीचे इलेक्ट्रिफिकेशन करण्याची क्षमता या

> आमच्या मान्यवर ग्राहकांमध्ये पुणे व सोलापूर महानगरपालिका, अदर पुनावाला क्लिन सिटी इनिशिएटीव्ह, बीव्हीजी ग्रुप, सोप्पा लॉजिस्टीक्स, ब्ल्यू व्हील्स, डिल्हीवरी, लॉग नाईन मोबिलिटी यांचा समावेश आहे.

प्लान्टमध्ये आहे. वाढत्या गरजेनुसार नजिकच्या भविष्यात चिंचोळी औद्योगिक वसाहतीतील नव्या कारखान्यात या ई–एलसीव्ही उत्पादनाचं विस्तारीकरण केलं जाणार आहे.

"प्रिसिजन आणि इमॉसच्या टीमने एकाच वर्षात लक्षणीय कामगिरी आहे. या यशामध्ये टीमचे कौशल्य, तंत्रसिद्धता आणि समर्पण वृत्ती याचा मोठा वाटा आहे. कंपनीच्या सर्वच विभागातील कामात नवीन दृष्टीकोन, कौशल्ये आणि अनुभव देणाऱ्या वेगवेगळ्या पार्श्वभूमीतील सदस्यांचे टीममध्ये स्वागत करण्यासाठी आम्ही नेहमीच उत्सुक आहोत. ई–मोबिलिटी क्षेत्राच्या भविष्याला आकार देण्यासाठी आम्ही सज्ज आहोत.

इमॉस इंडियाची इंजिनिअरिंग टीम आता बाणेर, पुणे येथील कार्यालयात आणि उत्पादनाची टीम सोलापुरातील प्लान्टमध्ये कार्यरत आहे.आपल्या मर्यादांच्या पलिकडे जात काम करणे हाच आमच्या प्रवासाचा आत्मा आहे, मागच्या वर्षी टाटा एस आणि अशोक लिलॅण्डची दोस्त या दोन गाड्यांचे इलेक्ट्रिक वाहनांमध्ये रूपांतर आम्ही केले.

त्यासाठी आमच्या टीमने अथक मेहनत घेतली. यातून अत्याधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करणे आणि वाहतुकीसाठी शाश्वत पर्याय देणे याबाबत असलेली आमची बांधिलकी दिसून येते. हे करत असताना भारतातील परिस्थिती आणि इथल्या आर्थिक स्थितीबद्दलही आम्ही सजग होतो. गाडीची एका चार्जिंगमधील रेंज आणि बॅटरी पॅकबाबत आम्ही उत्तम पर्याय उपलब्ध करून दिले आहेत. या इलेक्ट्रिक गाडीच्या पेलोडमध्ये – वजन वाहून नेण्याच्या क्षमतेमध्ये – कुठेही तडजोड न करता एका चार्जिंगमध्ये १०० किमीची शहरांतर्गत वाहतुक करू शकणारी वाहने आम्ही ग्राहकांकडे सुपूर्द केली आहेत.

२०२३ वर्षामध्ये रिपॉवर केलेल्या ई–एलसीव्ही काही महत्वपूर्ण ग्राहकांना वितरित केल्या. या गाड्यांच्या माध्यमातून आमच्या संशोधनाचा एक सकारात्मक परिणाम ग्राहकांच्या व्यवसायावर आणि पर्यावरणावर होताना दिसतो आहे. देशभरातल्या विविध क्षेत्रातील हे ग्राहक आहेत. गाडीबद्दलची विश्वासार्हता, तत्परता आणि परफॉर्मन्स याबाबत ग्राहकांचा आत्मविश्वास वाढण्यासाठी हे महत्वपूर्ण पाऊल होते. ग्राहकांच्या वैशिष्ट्यपूर्ण गरजा आणि त्यातील आव्हाने समजून घेण्यासाठी ग्राहकांसोबत आम्ही काम करत आहोत. ग्राहकांकडून मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादाने आमचा आत्मविश्वास अधिक दृढ झाला आहे. इमॉसच्या इलेक्ट्रिक गाड्या या केवळ पर्यावरणास अनुकूल नाहीत तर व्यवसायासाठी व्यवहारिक आणि किफायतशीर उपायही देतात. तसेच डिझेल गाड्यांच्या तुलनेत या गाड्यांची रनिंग कॉस्ट कमी येते. आमच्या मान्यवर ग्राहकांमध्ये पुणे व सोलापूर महानगरपालिका, अदर पुनावाला क्लिन सिटी इनिशिएटीव्ह, बीव्हीजी ग्रुपचा कचरा व्यवस्थापन विभाग आणि सोप्पा लॉजिस्टीक्स, ब्ल्यू व्हील्स, डिल्हीवरी, लॉग नाईन मोबिलिटी या शहरांतर्गत वाहतुक करणाऱ्या कंपन्या असून याशिवाय, पोर्टर, लेटस् ट्रान्सपोर्ट, मॅजेंटा डिलेव्हरी अशा आणखी काही ग्राहकांना इलेक्ट्रिक गाड्या देण्याविषयी परस्पर सामंजस्य करार करण्यात येणार आहेत.

शाश्वत वाहतुक पर्याय देण्यात नेतृत्व करणाऱ्या प्रिसिजन, इमॉस इंडिया आणि लॉगनाईन सायंटिफिक मटेरियल्स प्रा. लि. ही जलद बॅटरी चार्जिंग करण्याच्या तंत्रज्ञानात लिडर असणारी कंपनी यांच्यात महत्वपूर्ण भागीदारी झाली आहे. हे जाहीर करताना

> जलद बॅटरी चार्जिंग करण्याच्या तंत्रज्ञानात अग्रेसर कंपनी लॉगनाईन सायंटिफिक मटेरियल्स प्रा. लि. यांच्याशी प्रिसिजन आणि इमॉसची महत्वपूर्ण भागीदारी!

आम्हाला अभिमान वाटतो आहे. पर्यावरणपूरक वाहतूक, कार्बन वायुचे उत्सर्जन कमी करणे आणि हरित भविष्याकडे वाटचाल करणे या बाबी या भागीदारांमधला समान धागा आहे. या धोरणात्मक भागीदारीचा एक भाग म्हणून प्रिसिजनने लॉगनाईन मोबिलिटीला त्यांच्या ग्राहकांना व्यवसायिक वापरासाठी इलेक्ट्रिक ताफा विकला आहे. ही वाहने अत्याधुनिक आहेत. यासाठी लागणाऱ्या अत्याधुनिक बॅटरीजचा पुरवठा लॉग नाईन यांनी केला आहे. हलक्या व्यापारी वाहनांच्या क्षेत्रात अशा अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि १५ मिनिटात जलद चार्जिंगची सुविधा पहिल्यांदाच देण्यात आली आहे. देशाचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीतून मेक इन इंडिया ही चळवळ सुरू झाली. आम्हाला सांगायला अभिमान वाटतो की, आम्ही आमच्या पहिल्याच इलेक्ट्रिक वाहनामध्ये ९० टक्के सुटे भाग हे भारतीय बनावटीचे आहेत. सगळ्या ई–एलसीव्ही गाड्यांची जोडणी भारतातच आणि भारतीय ग्राहकांसाठीच करण्यात येते. एवढेच नव्हे तर आमचे सुट्या भागांचे पुरवठादारदेखील भारतातच उत्पादन करतात. या नव्या प्रवासात आमचे पुरवठादार, ग्राहक आणि संपूर्ण टीमची खूप मोठी साथ लाभली. सर्वात महत्वाचे इमॉसवर विश्वास दर्शवून इलेक्ट्रिक वाहनांच्या भविष्यातील वाटचालीत भागीदार झाल्याबद्दल आमच्या सर्व ग्राहकांचे मनापासून आभार. या इलेक्ट्रिक गाड्यांमध्ये सातत्याने सुधारणा करण्यासाठी, कार्यक्षमता

> पहिल्याच इलेक्ट्रिक वाहनामध्ये ९० टक्के सुटे भाग भारतीय बनावटीचे आहेत. या ई–एलसीव्ही गाड्यांची जोडणी भारतातच आणि भारतीय ग्राहकांसाठीच करण्यात येते.

वाढवण्यासाठी ग्राहकांचा अभिप्राय आमच्यासाठी अमूल्य आहे.




एल **करण शहा** सी
व्हीं कार्यकारी संचालक, प्रिसिजन ग्रुप चा

### करण शहा

हे प्रिसिजन ग्रुपमध्ये व्यवसाय विकासाचे कार्यकारी संचालक आहेत आणि कंपनीच्या व्यवसाय वाढीच्या धोरणाचे तसेच इलेक्ट्रिक मोबिलिटी व्यवसायाचे नेतृत्व करतात.

हार्वर्ड बिझनेस स्कूल, यूएसए मधून एमबीए आणि बीएस मेकॅनिकल इंजिनिअरिंग पर्ड्यू युनिव्हर्सिटी, यूएसए मधून पूर्ण केले. करण शहा नेदरलँड आणि भारतातील कंपनीच्या ईव्ही ऑपरेशन्ससह व्यवसाय विकास आणि ग्रुप कंपनीमध्ये ऑपरेशनल जबाबदाऱ्या हाताळतात.











### यतिन शहा

प्रिसिजनचे चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक यतिन शहा यांच्या नेतृत्वाखाली प्रिसिजनने गेल्या ३० वर्षात संपूर्ण जगाची कॅमशाफ्ट बाजारपेठ काबीज केली. यतीन शहा यांनी अभियांत्रिकी, गुणवत्ता, संशोधन आणि विकास प्रक्रिया या सर्वच पातळीवर कंपनीचा जागतिक पातळीवर बेंचमार्क यशस्वीरित्या निर्माण केला आहे. रशिया, युरोप, भारत, आशिया आणि अमेरिका मधील नवीन बाजारपेठांमध्ये प्रिसिजनच्या प्रवेशामध्ये यतिन शहा यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. परिणामी ४० हून अधिक देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्राहक मिळवण्यात कंपनीला यश मिळवता आले. जागतिक दर्जाच्या सुविधा आणि ऑटोमोबाईल क्षेत्रातील जगातील प्रमुख कंपन्यांसह ग्राहक आधार उभारण्यात त्यांचा सक्रियपणे सहभाग आहे.

इलेक्ट्रिक वाहन उद्योग निर्मितीमध्ये यतिन शहा यांचे व्यवसायिक कौशल्य आणि अनुभव यांचा मोठा वाटा असणार आहे.



### जी–२० परिषदेमध्ये सहभाग

नेदरलॅण्ड इकॉनॉमिक मिशन २०२३ च्या निमित्ताने जी २० परिषदेमध्ये इमॉस कंपनीचा थेट सहभाग होता. ही आमच्यासाठी फार मोठी सुवर्णसंधी होती, नेदरलॅण्ड इकॉनॉमिक मिशन २०२३ मध्ये प्रिसिजन आणि इमॉसचं प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळाली. जी–२० शिखर परिषदेच्या दरम्यान बेंगलुरु, पुणे आणि मुंबई इथे ही परिषद झाली. यावेळी डच उद्योग प्रतिनिधींसोबत बोलताना करण शहा यांनी नाविन्यता, शाश्वत वाहतुक पर्याय आणि जागतिक भागीदारी याविषयीची आमची बांधिलकी या परिषदेत व्यक्त केली.

नेदरलँड्स इकॉनॉमिक मिशन २०२३ या आर्थिक परिषदेस नेदरलँड्सचे पंतप्रधान मार्क रुट यांनी संबोधित केले. या परिषदेदरम्यान मिळालेली भागीदारी अमूल्य आहे आणि जागतिक बाजारपेठेत निःसंशयपणे आपल्या दोन्ही देशांना आणखी मोठ्या यशाकडे घेऊन जाईल, असे मार्क रुट यांनी आपल्या भाषणात अधोरेखित केले.करण शहा यांनी आपल्या भाषणात या परिषदेत सहभागी होण्याच्या संधीसाठी नेदरलँडच्या दूतावास, मुंबईतील एनएलचे महावाणिज्य दूतावास, बार्ट डी जोंग, परराष्ट्र व्यवहार मंत्रालय (NL) वॅम्पी लिबोन यांचे आभार मानले आणि या संधीसाठी आणि परस्पर ध्येयासाठी प्रत्येक शक्य मार्गाने योगदान देण्याचे अभिवचन दिले.



### रवींद्र जोशी

प्रिसिजन समूहाचे कार्यकारी संचालक तथा वित्त लेखाधिकारी म्हणून रविंद्र जोशी कार्यरत आहेत. कंपन्यांचे विलीनीकरण आणि अधिग्रहण, महसूल व्यवस्थापित करणे, नफा आणि संस्थेच्या आर्थिक आरोग्याची देखभाल करण्यात त्यांचे मोठे योगदान आहे. कंपनीच्या सर्व विस्तार योजनांमध्ये त्यांची महत्वपूर्ण भूमिका असते.

प्रिसिजनच्या आजवरच्या वाटचालीत रविंद्र जोशी यांचे नेतृत्व आणि व्यवस्थापकीय कौशल्य याचे मोठे योगदान आहे. त्यांनी कंपनीमधील अनेक विभागांच्या जवाबदाऱ्यां यशस्वीरित्या सांभाळल्या. त्यातून आपले नेतृत्व कौशल्य दाखवले आहे. तसेच प्रिसिजनमध्ये SAP–ERP च्या यशस्वी अंमलबजावणीसाठी त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. ई–एलसीव्हीच्या प्रस्थापनेत त्यांचे योगदान मोलाचे ठरले आहे.